# कांजुर डम्पिंग वनजमिनीवर

## जमीन संरक्षितच; उच्च न्यायालयाचा निर्वाळा

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कांजुरमार्ग येथील डम्पिंग ग्राउंड संरक्षित वनजमिनीवर आहे, असा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. ही जमीन 'संरक्षित वनजमीन' म्हणून पूर्ववत करण्यात येत असल्याचे न्यायालयाने निवाड्यात म्हटले आहे. यामुळे राज्य सरकार व मुंबई महापालिकेला मोठा झटका बसला आहे.


कांजुर गावातील सर्व्हे क्रमांक २७५ (अंशतः) ही ठाणे खाडीच्या किनाऱ्याजवळ असलेली ११९.९१ हेक्टर जमीन ७ जुलै २००८ रोजी 'संरक्षित वनजमीन' असल्याची अधिसूचना वन कायद्यांतर्गत प्रसृत करण्यात आली होती. मात्र, साधारण दीड वर्षानंतर म्हणजे २९ डिसेंबर २००९ रोजी ती अधिसूचना निरधिसूचित करण्यात आली. म्हणजेच ती जमीन 'संरक्षित वनजमीन' नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यापूर्वीच १७ मार्च २००९ रोजी त्या जमिनीवर डम्पिंग ग्राउंड सुरू करण्याविषयी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने महापालिकेला पर्यावरण मंजुरी दिली होती.

'संरक्षित वनजमीन' असूनही ते आरक्षण वगळणारी २९ डिसेंबर २००९ रोजीची अधिसूचना आणि केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची पर्यावरण मंजुरी अवैध असल्याचे म्हणत 'वनशक्ती' संस्थेने ज्येष्ठ वकील गायत्री सिंग यांच्यामार्फत सन २०१३मध्ये जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले होते. त्याविषयीच्या अंतिम सुनावणीअंती २९ जुलै २०२४ रोजी राखून ठेवलेला निर्णय न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. सोमसेखर सुंदरेसन यांच्या खंडपीठाने शुक्रवारी जाहीर केला.

'कांदळवनांच्या संरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने सन २००५मध्ये दिलेला महत्त्वाचा निवाडा आणि वनकायद्यातील त्याविषयीच्या तरतुदींचा विचार करूनच, उपग्रहीय तपासणीसह वनकायद्याच्या कलम २९अन्वये आवश्यक (पान ९वर)



- सरकार, महापालिकेला झटका
- वनजमिनीची अधिसूचना निरधिसूचित करण्याचा आदेश रद्द
- तीन महिन्यांत कायदेशीर कार्यवाहीचे आदेश



### महापालिकेला असा आदेश

'डम्पिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या ११९.९१ हेक्टर जमिनीची स्थिती संरक्षित वनजमीन म्हणून पूर्ववत करण्यात येत आहे. ते आरक्षण हटवण्याच्या कोणत्याही प्रस्तावासाठी कायद्याच्या कलम २(१)च्या कायदेशीर प्रक्रियेचे पालन करावे लागेल. त्यानुसार, योग्य ती पावले उचलण्यास महापालिकेला तीन महिन्यांचा कालावधी देत आहोत', असे खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले. याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता यावे, म्हणून आदेश स्थगित करण्याची विनंती सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी केली. मात्र, 'आदेश पालनासाठी तीन महिने दिले आहेत. त्यामुळे स्थगितीच्या विनंतीच्या विचाराची गरज नाही', असे खंडपीठाने स्पष्ट केले.

### मुंबईतील डम्पिंग ग्राऊंडची स्थिती

- कांजुर डम्पिंग ग्राऊंड हे साधारण सन २०११पासून अस्तित्वात
- देवनार डम्पिंग ग्राऊंडची क्षमताही जवळपास संपत आली
- मुलुंड डम्पिंग ग्राऊंड क्षमता संपल्याने डिसेंबर, २०१८पासून बंद
- गोराई डम्पिंग ग्राऊंडची क्षमता संपल्याने तेही बंद